अंत्रोली-विहीर रस्ता

ता. १८/१२/२००८

'मनसे'ने काम बंद पाडले

ग्रामस्थांची तक्रार : काम निकृष्ट दर्जाचे असल्याचा आरोप

वेल्हे, ता. २२ : अंत्रोली ते विहीर (ता. वेल्हे) दरम्यान सुरू असलेल्या रस्त्याचे काम मनसेच्या कार्यकर्त्यांनी व ग्रामस्थांनी बंद पाडले. निकृष्ट दर्जाच्या कामाची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अन्यथा तीव्र आंदोलन करू, असा इशारा मनसेचे जिल्हा कामगार सेनेचे उपाध्यक्ष संतोष दसवडकर यांनी दिला आहे.

विहीर-अंत्रोली दरम्यानचा रस्ता जिल्हा परिषदेच्या निधीतून मंजूर झाला. खडी पुरविणे, मऊ मुरूम पुरविणे, रस्त्यांची टाचई करणे, खडी पसरविणे, मुरूम पसरवणे, खडी दबाई करणे, सिंगल कोट सरफेस ट्रिसिंग करणे, माहिती फलक लावणे आदी कामांसाठी सात लाख ४९ हजार पाचशे दोन रुपये मंजूर झाले आहेत. मात्र या प्रमाणात कोणतेच काम न करता सदर ठेकेदार फक्त खडी टाकून त्यावर बारीक खडी पसरवून रस्त्यांचे काम करीत असल्याचे नागरिकांच्या लक्षात आले. रस्त्यासंबंधीची संपूर्ण माहिती घेऊन ग्रामस्थांनी काम थांबविण्याचा निर्धार केला. सदर कामाची चौकशी करून कारवाईची मागणी करण्यात आली आहे.

या वेळी संतोष दसवडकर, नाना काकडे, रघुनाथ घिडले, दामू राऊत, भीमाजी देवगिरकर, आबा मरळ, नामदेव राऊत, संतोष लोहकरे, माऊली पडवळ, कैलास भिकुले, विष्णू थोपटे उपस्थित होते. घिसर, निवी, गेंव्हडे, कोदापूर, भोसलवाडी, चांदर, मोहरी, गेळगाणी, सिंगापूर, अंत्रोली, विहीर आदी गावांचे ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.